# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
### महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.

Web : www.dhepune.gov.in E-mail : scholarshiphd@gmail.com

फोन नं. ०२०/२६१२६९३९ फॅक्स नं. ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/शिष्य/नमं/शाविनि/२०१६-१७/ दि.११.०७.२०१६

**परिपत्रक :-**

**विषय : शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती नविन मंजूरी सन २०१६-१७**

संदर्भ : १. शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्र.एससीएच-१४७४/१०५०२३/३५, दि. २० जानेवारी १९७७

२. शासन निर्णय शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. एससीएच-१०८५/ १५३७५/ (८०/८५) विशि-५. दि. २ सप्टेंबर, १९८६.

शासकीय विद्यानिकेतनमधुन राज्य परीक्षा मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०१६ मध्ये उत्तीर्ण झालेल्या व अकरावीसाठी महाविद्यालयामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांकडून विषयांकित शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज दि. ३० सप्टेंबर, २०१६ पर्यंत मागविण्यात येत आहेत.

- **शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती योजना नवीन मंजूरी अटी -**

१. सदर योजनेचा लाभ घेऊ इच्छिणारा विद्यार्थी हा शासकीय विद्यानिकेतन पुसेगाव (सातारा), अमरावती, औरंगाबाद किंवा धुळे यांमधून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (१० वी) मार्च २०१६ उत्तीर्ण झालेला असावा.

२. सदर विद्यार्थ्यास माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेमध्ये किमान ६० टक्के गुण प्राप्त असणे आवश्यक आहे.

३. विद्यार्थ्यांने अर्जासोबत संबंधित शासकीय विद्यानिकेतनमधून प्राप्त इन्टायटलमेंट कार्ड (अधिकार पत्र) सादर करणे आवश्यक आहे.

४. विद्यार्थ्यांने आवेदनपत्रात त्याच्या राष्ट्रीयीकृत बँकेचा तपशील अचूक भरलेले असावा. तसेच आवेदनपत्रासोबत बँकेच्या पासबुकच्या पहिल्या पानाची सुस्पष्ट छायांकित प्रत जोडलेली असावी.

- **शासकीय विद्यानिकेतन यांचेसाठी --**

आपल्या विद्यानिकेतनमधून माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०१६ मध्ये ६० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक गुण प्राप्त करुन उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी व त्या यादीमध्ये

(कृ. मा. प.)

विद्यार्थ्यांनी सन २०१६-१७ मध्ये ज्या महाविद्यालयात प्रवेश घेतला आहे त्या महाविद्यालयाचे संपूर्ण नाव, पत्ता व त्यासोबत इन्टायटलमेंट कार्ड (अधिकार पत्र) इ. माहिती संचालक, उच्च शिक्षण, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११ ००१ या पत्त्यावर **दिनांक ३० सप्टेंबर, २०१६** पर्यंत पोहोचेल अशा पध्दतीने पाठविण्यात यावी.

- **महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे प्रस्ताव खालील बाबीची पडताळणी करुनच संचालनालयास पाठवावे**

१. विद्यार्थ्याने आवेदनपत्रात त्याच्या राष्ट्रीयीकृत बँकेचा तपशील अचूक भरलेला असावा. तसेच आवेदनपत्रासोबत बँकेच्या पासबुकच्या पहिल्या पानाची सुस्पष्ट छायांकित प्रत जोडलेली असावी.

२. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या अर्जासोबत मागील वर्षाच्या परीक्षेची गुणपत्रिका साक्षांकित करुन जोडण्यात यावी. प्रस्ताव हे फक्त सन २०१६-१७ या वर्षीचे पाठवावे. यापूर्वीचे प्रस्ताव पाठवू नये.

३. नवीन मंजूरीसाठी अर्ज करणारा विद्यार्थी हा शासकीय विद्यानिकेतन पुसेगाव (सातारा), अमरावती, औरंगाबाद किंवा धुळे यांमधूनच माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (१० वी) मार्च २०१६ उत्तीर्ण झालेला असावा.

४. पाठविलेल्या आवेदन पत्रावर प्राचार्यांची अथवा संस्था प्रमुखांची सही व शिक्का आवश्यक आहे. त्याशिवाय आवेदनपत्र स्विकारले जाणार नाही.

उपरोक्त नमुद सर्व अटींची पुतर्ता करणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांचे प्रस्ताव महाविद्यालयांनी संचालक, उच्च शिक्षण, मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००१ या पत्त्यावर दि. ३० सप्टेंबर, २०१६ पर्यंत पोहोचतील अशा पध्दतीने पाठवावेत. सदर मुदतीनुतर प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.

(डॉ. वि. रा. मोरे)
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत : १. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई, पुणे, कोल्हापूर, जळगाव, अमरावती, नागपूर, पनवेल, औरंगाबाद, नांदेड, सोलापूर विभाग.
२. प्राचार्य, शासकीय विद्यानिकेतन, पुसेगाव, ता. खटाव, जि. सातारा.
३. प्राचार्य, शासकीय विद्यानिकेतन, झकीर कॉलनी, अमरावती - ४४४ ६०१.
४. प्राचार्य, शासकीय विद्यानिकेतन, उस्मानपुरा, औरंगाबाद - ४३१ ००१.
५. प्राचार्य, शासकीय विद्यानिकेतन, नवनाथ नगर, धुळे - ४२४ ००१.